जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४ दिनांक - २२/०१/२०२४**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

**कोंढवा पोलीस ठाणे परिसरात हातभट्टीवाल्या अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे शहरातील कोंढवा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गावठी हातभट्टी दारुचे गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे- **भिमय्या लिंगय्या भंडारी,वय-२३ वर्षे,रा.राजलक्ष्मी फर्निचर दुकानाचे मागे,कानडेनगर, उंड्री,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्यांचे साथीदारांसह कोंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीत गावठी हातभट्टी दारुचा साठा करुन विक्री करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०२ वर्षामध्ये त्यांचेविरूध्द ०५ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास व जीवीतास धोका निर्माण होवून सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्या दहशतीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

कोंढवा पोलीस स्टेशन यांनी सादर केलेला प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले असून,त्यास नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.संतोष सोनवणे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे आधिपत्याखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **त्यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ९१ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.